# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/02/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## अवैध रेती (गौणखनिज) ची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २२/०२/२०२४ चे ०२.०० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो.स्टे. खापा हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, एक इसम वाकोडी गावाच्या ग्रामपंचायत जवळ ट्रॅक्टर संलग्न टाली मध्ये अवेद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून वाकोडी गावाच्या ग्रामपंचायत जवळ नाकाबंदी करीत असताना एक अवैध रेती वाहतुक संबंधाने जॉन डियर ५२०४ कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम.एच–४०/एल– ४२३७ व ट्राली क्र. एम.एच–४०/एल– ५५८४ येतांना दिसले. सदर वाहनातील **आरोपी नामे– राजकुमार अन्नाजी चौधरी, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. २ वाकोडी सावनेर** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अंदाजे १२० स्के., फूट रेती (गौणखनिज) मिळून आल्याने सदर वाहन चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून ट्रॅक्टर क्र. एम.एच–४०/एल– ४२३७ किंमती ५,००,०००/–रू. व ट्राली क्र. एम.एच–४०/एल– ५५८४ किमती ७०,०००/– रू. चे डाल्यात १२० स्केअर फुट रेती (गौणखनिज) किंमती १०००/–रू. असा एकुण ५,७१,०००/–रू. मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे– राजकुमार अण्णाजी चौधरी वय ३६ वर्ष, रा. वाकोडी खापा व ट्रॅक्टरचे मालक त्याचे वडील अन्नाजी चौधरी** यांचेविरुद्ध पोस्टे खापा येथे कलम ३७९ भादंवि. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता अन्वये पो. स्टे. खापा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोलीस हवालदार राजू रेवतकर, किशोर वानखेडे यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर